PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Munnabhai S S C
Year: 2005

Song: Swapn Dile Tu Marg Tuch De
Lyricist:

स्वप्न दिले तू मार्ग तूच दे
सुर दिले तू शब्द तूच दे
स्वप्न दिले तू मार्ग तूच दे
सुर दिले तू शब्द तूच दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे
गरीब श्रावण बाळ जयाचं
सरळ साधे स्वप्न होते
गरीब श्रावण बाळ जयाचं
सरळ साधे स्वप्न होते
सहस्त्र करांनी देणारा तू
नको असे पुन्हा स्वप्न भंगू दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे
नयन दिले तू नजर तूच दे
पंख दिले तू गगन तूच दे

श्वास दिला तू साथ तूच दे
ध्येय दिले तू ध्यास तूच दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे
जगायचे जर असेच होते
कशास आम्हा जन्म दिला तू
कशास आम्हा जन्म दिला तू
झुरायचे जर असेच होते
कशास आम्हा घास दिला तू
कशास आम्हा घास दिला तू
खूप साहलो आता सुख दे
जगण्याची पुन्हा आस मनी दे
हे दया घना शाप संपू दे
लढण्याची शक्ती आम्हा तूच दे
खूप साहलो आता सुख दे
जगण्याची पुन्हा आस मनी दे
हे दया घना शाप संपू दे
लढण्याची शक्ती आम्हा तूच दे
लुळया पांगळया आयुष्याला
जगण्याचा महामंत्र तूच दे

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*